खुनाचा प्रयत्न करून फरार झालेल्या आठ आरोपींना अटक; उमरेखड हद्दीतील घटना >>पान 2

योगाला आपली जीवनशैली बनवा, निरोगी आयुषासाठी योग साधनेला अंगीकारा: आयुष मंत्री प्रतापराव जाधव >>पान 3

शिक्षकांवरील निलंबनाच्या कारवाईचा पुनर्रविचार व्हावा >>पान 4


**सुविचार**

आपल्या भावनांचा आदर करा.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 277 ■ बुधवार, दि. 18 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




लाडकी बहीण योजनेवर सिनेमा येणार, गौतमी पाटील अन् आण्णा नाईक महत्त्वाची भूमिका साकारणार

आतील पान

# कृषीसाठी 'एआय' धोरण मंजूर

## राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय; आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुपटीने वाढ



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज संपन्न झाली. या बैठकीत १० मोठे निर्णय घेण्यात आले असून राज्यात शेतीसाठी एआय धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. यासह, आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री-एआय धोरण २०२५ ते २०२९ मंजूर करण्यात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून कृषि क्षेत्रात परिवर्तन घडविता येणार आहे. त्यामुळे, मंत्रिमंडळ बैठकीतील हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. यासह, धारावी पुनर्विकास, अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.**

**राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील १० मोठे निर्णय**

ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार. (महसूल विभाग)

एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाचा मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार. (महसूल विभाग)

मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार. (महसूल विभाग)

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी (एसपीव्ही) आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनर्वसन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार. (महसूल विभाग)

केंद्र सरकारच्या WINDS (Weather Information Network Data System) प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची (AWS-Automatic Weather Station) उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामान विषयक अचूक माहिती मिळावी यासाठीचा प्रकल्प. शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महत्वाचा प्रकल्प. (कृषि विभाग)

महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री-एआय (Maha-gri-AI) धोरण २०२५-२०२९ मंजूर. कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडविता येणार. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्र्लेषण यांचा वापर करत, राज्यातील ग्रीस्टॅक, महा-ग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, गमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार. (कृषि विभाग)

मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक व न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या कर्जास मुदतवाढ. (नगरविकास विभाग)

विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग).

आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ. हयात जोडीदारालाही मानधन मिळणार. गौरव योजनेमध्ये सुधारणा. (सामान्य प्रशासन विभाग).

अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवासी भारतीयांच्या व्याख्येत बदल. प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

## बस विहीरीच्या कठड्यावर जावून थांबल्याने सुदैवाने मोठी दुर्घटना टळली



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** सांगलीतील तासगावच्या येळावीजवळ बसचा मोठा अपघात टळला आहे. रस्त्यालगत असणाऱ्या विहीरीत बस पडता-पडता वाचली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. तासगावातील आगाराची एमएच १० ३९९५ ही बस चिंचवडहून तासगावकडे निघाली होती. येळावी जवळ आल्यानंतर चालकाचा बसवरील ताबा सुटला, त्यामुळे बस रस्त्याकडेला असलेल्या शेतात घुसली. भरधाव वेगाने बस विहीरीच्या दिशेने जात असल्याने बसमधील प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला. परंतु बस शेतातील विहीरीच्या कठड्याजवळ जावून थांबली. केवळ दैव बलवत्तर म्हणून या बसमध्ये असणारे प्रवासी बालंबाल बचावले. बसमध्ये प्रवासी देखील मोठ्या संख्येने होते.

## रत्नागिरीसह पुणे, सातारा, कोल्हापूर घाटमाथ्यावर वादळी पावसाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यभरात सध्या पावसाचा जोर वाढला आहे. भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या अंदाजानुसार पुढील २४ तासांकरिता रत्नागिरी, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. राज्यात मागील २४ तासांमध्ये (१७ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) मुंबई उपनगर जिल्ह्यात ८३.४ मिमी पाऊस झाला आहे. तर ठाणे जिल्ह्यात ७३.७ मिमी, मुंबई शहर ६२.९ मिमी, रायगड ५४.१ मिमी आणि पालघर जिल्ह्यात ४९.७ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

## युवराज सिंग, हरभजन सिंग आणि सुरेश रैना तिघांची ईडीकडून चौकशी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय संघाचे दिग्गज क्रिकेटपटू अडचणीत सापडले आहेत. भारताला विश्वविजेत्या बनवणाऱ्या संघाचे भाग असलेले युवराज सिंग, हरभजन सिंग आणि सुरेश रैना यांची ईडीकडून चौकशी करण्यात आली आहे. या तिघांव्यतिरिक्त अभिनेत्री उर्वशी रौतेलाचीही चौकशी करण्यात आली आहे. पण नेमके प्रकरण काय आहे, जाणून घेऊया.

हरभजन, युवराज आणि सुरेश रैना यांच्याबरोबर अभिनेता सोनू सूद आणि अभिनेत्री उर्वशी रौतेला यांचीही ईडीकडून चौकशी करण्यात आली आहे. यांच्यावर बेकायदेशीर ऑनलाइन बेटिंग ॲप्ससाठी जाहिराती केल्याचा आरोप आहे. वन एक्स बेट, फ `यरप्ले, पारिमॅच आणि लोटस३६५ सारख्या बंदी घातलेल्या प्लॅटफॉर्मशी जाहिराती करण्याबाबत प्रश्न विचारण्यात आले आहेत. सध्या या बेकायदेशीर



ऑनलाइन बेटिंग ॲप्सचा तपास केला जात आहे.

वन एक्स बेट सारख्या बंदी घातलेल्या प्लॅटफॉर्मच्या जाहिरातीमध्ये या सेलिब्रिटींच्या सहभागाबाबत चौकशी करण्यात आली आहे. बंदी घातलेल्या या ऑनलाईन बेटिंग ॲप्सबाबत आधीच चौकशी सुरू आहे, त्याबाबतच यांना प्रश्न विचारण्यात आले. हे प्लॅटफॉर्म '१दलशीं' सारखी प्रतिनिधी म्हणून इतर नावांचा वापर करत होते ज्यात वेब लिंक्स आणि ठथ कोड होते जे युजर्सना बेकायदेशीर बेटिंग प्लॅटफॉर्मवर रिडायरेक्ट करतात आणि जे कायद्यांचे उल्लंघन आहे.

## आधी सुप्रियाला अधिकार अन् आता नकार! राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणावर पवारांची गुगली

दैनिक आपला विदर्भ

**पिंपरी-चिंचवड /प्रतिनिधी :** राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या विलीनीकरणाच्या मुद्यावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुन्हा एकदा गुगली टाकली आहे. राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर सुप्रिया सुळे आणि इतर नेते निर्णय घेतील, आपण त्यात नसणार असे शरद पवार यांनी अनौपचारिक भाष्य केले होते. त्यानंतर आता शरद पवारांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर भाष्य करताना महत्त्वाचे वक्तव्य केले आहे.

पिंपरी-चिंचवड येथे पक्षाच्या कार्यक्रमात बोलताना शरद पवार यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले. पवार यांनी संधीसाधूपणाचं राजकारण करू नका असे आवाहन केले. त्याच वेळी मात्र त्यांनी सगळे बरोबर घेता येतील. पण सत्तेसाठी भाजप बरोबर जाणाऱ्यांची साथ नको असे स्पष्ट वक्तव्य केले. पवारांच्या वक्तव्याने आता दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची शक्यता धूसर झाली असल्याची माहिती समोर आली आहे. कोणासोबतही संबंध ठेवा,



पण भाजपसोबत संबंध ठेवू नका, अशी स्पष्ट भूमिका शरद पवार यांनी घेतली. त्यामुळे आता राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा थंड बस्तानात गेली असल्याचे म्हटले जात आहे.

शरद पवार यांनी आपल्या भाषणात आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबतही भाष्य केले. आगामी पालिका निवडणुकीसाठी नव्या नेतृत्वाची फळी निर्माण करावी लागणार आहे. या नव्या फळीच्या मार्फत आपल्याला बदल घडवावा लागणार असल्याचे म्हटले. भावी पिढीने प्रेरणा घ्यायला हवी असा विकास करायचा आहे, यासाठी संघटन मजबूत करावी लागेल. जे गेले त्यांची चिंता करू नका असे पवार यांनी यावेळी म्हटले.

## १३ वर्षीय मुलाला गळा चिरून संपवले, मृतदेह शेतात फेकून दिला, नरबळीच्या संशयाने गावकऱ्यांमध्ये दहशत

**जळगाव /प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात एरंडोल तालुक्यात धक्कादायक घटना समोर आली आहे. १३ वर्षीय मुलाची गळा चिरून त्याची हत्या करून त्याचा मृतदेह फेकून दिल्याची घटना खर्ची गावात समोर आल्याने खळबळ उडाली आहे. तेजस महाजन असे मृत झालेल्या मुलाचे नाव असून, ही घटना नरबळीसाठी तर झाली नाही ना? असा संशय ग्रामस्थानी व्यक्त केला आहे. पोलिस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील खर्ची गावात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. रिंगणगाव येथे राहणाऱ्या १३ वर्षीय तेजस गजानन महाजन या बालकाचा गळा चिरून खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. त्याचा मृतदेह शेजारच्या खर्ची गावाजवळ एका शेतात सापडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही हत्या नरबळीच्या उद्देशाने तर करण्यात आली नाही ना, असा संशय आता ग्रामस्थांकडून व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

# घाबरू नका ! हातापायाला भेगा पडण्याचा आजार संसर्गजन्य नाही ; आरोग्य विभागाच्या उपाययोजना सुरु

दैनिक आपला विदर्भ

- ➤ १४ रुग्णांना एक्झामा आजाराचे निदान
- ➤ आजाराचा पाण्याशी कोणताही संबंध नाही
- ➤ बाधितांना आजाराचा पूर्वइतिहास

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील शेलगांव देशमुख या गावात हात व पायाच्या तळव्यांना भेगा पडत असलेले रुग्ण आढळून आले आहेत. हा आजार संसर्गजन्य नसून पाण्याशी कोणताही संबंध नाही. नागरिकांनी घाबरुन न जाता लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला व उपचार घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

मेहकर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र डोणगांवअंतर्गत शेलगांव देशमुख या गावामध्ये अनेक व्यक्तींना तळहात व तळपायावर भेगा पडणे, साल जाणे, खाज येणे इत्यादी लक्षणे उद्भवत असल्याबाबत माहिती मिळताच उपकेंद्र शेलगांव देशमुख व आयु. दवाखाना शेलगाव देशमुख येथील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा यांचे मार्फत १४ व १५ जून रोजी घरोघरी शीघ्र सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामध्ये २० लोकांना अशा प्रकारची लक्षणे असल्याचे निदर्शनास आली. यानुषंगाने १५ जून रोजी जिल्हास्तरावरुन शीघ्र प्रतिसाद पथकाने भेट देऊन परिस्थीतीचा आढावा घेतला असल्याची माहिती जिल्हा आरोग्य प्रशासनाने दिली आहे.

या आजाराविषयी जिल्हा साथरोग तथा सर्वेक्षण अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, वैद्यकीय अधिकारी तथा त्वचारोग तज्ञ डॉ. बालाजी आगट यांनी केलेल्या तपासणीअंती २० पैकी १४ रुग्णांना एक्झामा / पामोप्लांटर केराटोडर्मा / पामोप्लांटर सोरायसीस हे आजार असल्याचे निदान झाले. या व्यक्तींना हे आजार मागील एक ते ५ वर्षांपूर्वीपासून असल्याचा रुग्ण इतिहास आहे. या रुग्णांचे बुलढाणा व अकोला येथील त्वचारोग तज्ञांकडे उपचार सुरु आहेत.

हा आजार संसर्गजन्य नाही. या आजाराचा पाण्याशी कोणताही संबंध



नाही. विविध प्रकारच्या प्रतिजन/हानिकारक पदार्थांच्या संपर्कात व्यक्ती आल्यास स्वयंप्रतिकार पध्दतीचा हा आजार उद्भवू शकतो. ही लक्षणे दीर्घकाळपर्यंत राहू शकतात. हा आजार संसर्गजन्य नसल्याने एका व्यक्तीकडून



दुसऱ्या व्यक्तीस संक्रमण होत नाही. त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये, असे जिल्हा आरोग्य प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच अशी लक्षणे उद्भवल्यास तात्काळ नजीकच्या शासकीय रुग्णालयात जाऊन उपचार व सल्ला घ्यावा. डॉक्टरांनी सांगितलेला औषधोपचार व पथ्याचे पालन करावे, असे आवाहन देखील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गीते यांनी केले आहे.

## फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धे नंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# खुनाचा प्रयत्न करून फरार झालेल्या आठ आरोपींना अटक; उमरेखड हद्दीतील घटना

## स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ व उमरखेड पोलिसांची संयुक्तीक कारवाई

**दैनिक आपला विदर्भ**




**उमरखेड/प्रतिनिधी :** खुनाचा प्रयत्न करून फरार झालेल्या ८ आरोपींना यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखा व उमरखेड पोलिसांनी संयुक्त १७ जून रोजी अटक करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार ८ जून २०२५ रोजी पोलीस स्टेशन उमरखेड हद्दीत फिर्यादी शेख आरीफ शेख निसार वय २४ , रा. आठवडी बाजार उमरखेड यांस व त्याच्या भावास यांतील आरोपी शेख तैमीर शेख समीर, गुजू शहा जावेद शहा त्याचे इतर ८ ते १० साथीदार यांनी गैर कायद्याची मंडळी जमवून हातात तलवार, लाठीकाठी घेवून लवारीने व काठीने मारुन जिवेठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यावरून परस्पर विरोधी उमरखेड पोलीस स्टेशनला कलम १०३ (१) १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९० भान्यांस व कलम १३५ मपोका सह कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पैंकी अप क्रमांक ४४४/२०२५ कलम १०९, १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९० भान्यांस व कलम १३५ मपोका सह कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये १५ जून २०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.सदर गुन्ह्यांचे गांभीर्य ओळखून व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, याकरिता पोलीस अधीक्षक यवतमाळ यांनी यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व उमरखेड पोलीस निरीक्षक यांना दोन टीम तयार करून सदर गुन्ह्यातील आरोपी तात्काळ अटक करण्याबाबत सूचना दिल्या होत्या, त्याप्रमाणे सदर गुन्ह्यातील आरोपींची दोन्ही टीम वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेत होत्या.१७ जून २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा पथक यवतमाळ कॅम्प पुसद व पोलीस स्टेशन उमरखेड डीबी पथक असे सयुक्तीकरित्या आरोपी शोध घेत असतांना यातील आरोपी परवेज खान सलीम खान (लाला), शेख तैमीर ऊर्फ समीर शेख, शेख आझीम ऊर्फ इचोडा शेख पाशा, शेख ईब्राहीम ऊर्फ इरफान शेख पाशु, शेख मुजाहीद ऊर्फ मुज्जू शहा जावेद अली शहा, सयद आरीफ सबद युसूफ, एफीज्जोदीन ऊर्फ गौसू मुज्जोदीन काझी असे नागपूर-नांदेड हायवे रोड ढाणकी कडे जाणा-या ब्रिज खाली थांबले असल्याबाबत गोपनिय माहिती मिळाल्याने त्या ठिकाणी दॉन्ही टिमने जावून पोलीस कोशल्याचा वापर करुन अतिशय शिताफीने सापळा लावून यशस्वी कारवाई करून ७ आरोपींना ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपी शेख मोबीन ऊर्फ मुन्ना शेख रऊफ यांस त्याचे राहत्या घरातून ताब्यात घेतले. अशा प्रकारे सर्व आरेपीना सदर गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक सतीश चवरे, पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनात स.पो.नि. धिरज बांडे, स.पो.नि.निलेश सरदार, पोउपनि शरद लोहकरे, पोउनि सागर इंगळे, पोहवा मुन्ना आडे, पोहवा संतोष भोरगे, पोहवा तेजाब रणखांब, पोहवा सुभाष जाधव, पोहवा कुणाल मुंडोकार, पोहबा रमेश राठोड, पोशि सुनिल पंडागळे, चापोशि राजेथ जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ तसेच उमरखेड पोलीस स्टेशन पोहवा मधुकर पवार, पोशि संगशिल टेंभरे, पोशि प्रफूल भुसे, पोशि निवत्ती महाळनर यांनी केली आहे.

# अन् कवितेत रमले रविकांत तुपकर!

## लढवय्या नेत्यांच्या नथने जिंकली मने

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची मुलुखमैदानी तोफ म्हणून ओळखले जाणारे फायरब्रँड नेते रविकांत तुपकर यांचा आता एक अनोखा अंदाज समोर आला आहे. नेहमीच आक्रमक भाषणाने आणि ठाम भूमिकेने सरकारला सळो की, पळो करून सोडणारे रविकांत तुपकर आपल्या अनोख्या अंदाजाने नेहमीच जनतेची मने जिंकतात. एरवी आक्रमक भूमिका घेणारे रविकांत तुपकर मात्र, राजकीय मैदानातून थोडे साहित्य क्षेत्रात रमले.त्यांनी 'नथ' नावाची कविता आपल्या हटके अंदाजात सादर करून अनेकांची मने जिंकली!



शेतकरी, शेतमजूर, तरुणांसाठी भांडणारा लढवय्या नेता अशी प्रतिमा असलेले रविकांत तुपकर यांचा साहित्य, कला, गझल आणि कविता क्षेत्रातही मोठा वावर आहे. ते वेळोवेळी कविता-गझलांच्या मैफिलीही भरवत असतात, साहित्य संमेलने भरवणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत करणे, नव्या कवीं गझलकरांना प्रोत्साहन देणे हे काम सात्यत्याने रविकांत तुपकर करत असतात. राज्यातील अनेक साहित्यिकांशी, विचारवंतांशी, गझलकारांशी, कवी, लेखक, नाटककारांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. बाहेरून आक्रमक आणि आतून संवेदनशील मनाचा माणूस म्हणून तुपकरांची नव्याने ओळख कवितेतून प्रकट झाली आहे. कविता आणि लढा, दोन्ही समांतरपणे निसंकोचपणे मांडणारा नेता म्हणजे रविकांत तुपकर असल्याच्या प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहेत.ही कविता सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. रविकांत तुपकर यांनी आपल्या राजकीय क्षेत्राबरोबर साहित्य क्षेत्रातही उत्कृष्ट कवी म्हणून एक वेगळी छाप पाडली आहे.

## लाडकी बहीण योजनेवर सिनेमा येणार, गौतमी पाटील अन् आण्णा नाईक महत्त्वाची भूमिका साकारणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारच्या लोकप्रिय लाडकी बहीण योजनावर आधारित सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'' योजना सुरु करण्यास महाराष्ट्र शासनाने २८ जून २०२४ रोजी मान्यता दिली. या योजनेमार्फत महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिना रु. १,५००/- असा आर्थिक लाभ द्वारे देण्यात येणार येतो. दरम्यान, या योजवर आता सिनेमा येणार असून नृत्यांगणा गौतमी पाटील आणि रात्रीस खेळ चाले फेम आण्णा नाईक या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणार आहेत.

लाडकी बहीण योजनेवरील सिनेमात प्रसिद्ध नृत्यांगणा गौतमी पाटील प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. तिच्या अभिनयाच्या जोडीला रात्रीस खेळ चाले फेम लोकप्रिय अभिनेते अण्णा नाईक यांची दमदार साथ असणार आहे. या दोघांची जोडी प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देईल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे.

# आषाढीच्या रिंगण सोहळ्यात धावणारा 'बलराज' अश्व निघाला; ४० वर्षांपासून सेवा, मोहिते पाटलांना मान

**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** पंढरीच्या आषाढी वारीसाठी जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान उद्या १८ जून रोजी देहू येथून होत असून यासाठी अकलूज येथील डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील यांचा बलराज हा अश्र्व आज पालखी सोहळ्याकडे रवाना झाला. गेले ३५ ते ४० वर्ष मोहिते पाटील यांचा अश्र्व जगद्गुरूंच्या पालखी सोहळ्यात रिंगणासाठी धावत असतो. मोहिते पाटलांचा हा पताकाधारी अश्र्व बलराज गेली चार वर्ष जगद्गुरुंच्या सेवेत आहे. बलराज हा मारवाड जातीचा आणि सर्व शुभ लक्षण असणारा देखणा अल्बक आश्र्व असून गेली ५ वर्षे तो जगद्गुरूंच्या पालखी सोहळ्यात रिंगणामध्ये पताकाधारी अश्र्व म्हणून धावत आलेला आहे. आजवर बलराजकडून कोणत्याही भाविकाला कसलीही इजा झालेली नाही. हजारोंच्या गर्दीतही शांतपणे राहणारा हा बलराज पाचव्या वर्षी आता जगद्गुरूंच्या रिंगण सोहळ्यात धावणार आहे.

आषाढी वारीतील लक्षवेधी रिंगणात धावण्यासाठी वर्षभर बलराजला रिंगण सोहळ्याचे प्रशिक्षण देण्यात येत होते. याशिवाय हजारो भाविकांसोबत चालावे लागत असल्याने त्यासाठीचेही विशेष प्रशिक्षणही अश्र्व बलराजला देण्यात आले आहे. त्यासाठी त्याला वर्षभर हरभरा, गुळ, दुध, तूप, गव्हाचा भूस्सा असा खास खुराक दिला जात होता. आषाढी वारीसाठी रवाना होण्यापूर्वी महिनाभर आधी या खास खुराकाबरोबर शिजवलेली बाजरी, मल्टीव्हिटॅमिन, प्रोटीन व कॅल्शियमयुक्त असे विशेष खाद्य दिले जाते. देहू ते पंढरपूर असा आषाढी पायी वारीचा प्रवास असणारी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी देहुच्या वाड्यातून प्रस्थान होत आहे. या पालखी सोहळ्यात अश्र्वाच्या रिंगणासाठी मानाचा बाभुळकरांच्या अश्र्वाबरोबरच पताकाधारी अश्र्व सेवेचा मान दिवंगत प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी ४० वर्षांपूर्वी सुरु केला. त्यांच्या पश्र्चात डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील व त्यांच्या आई पद्मजादेवी मोहिते पाटील यांनी अश्र्वसेवा सुरुच ठेवली आहे.





आषाढी वारीसाठी मोहिते पाटील यांचा बलराज अश्र्वाची वर्षभर देखभाल अश्र्व प्रशिक्षक पहात असतात. बलराजची तेलाने मालिश करुन सर्वांग तगडे केले जाते. त्याचबरोबर गोल रिंगणाकरीता धावण्याचं प्रशिक्षणही देण्यात येते. आषाढी वारीसाठी रवाना झालेला बलराज अश्र्व हा महाराणा प्रताप यांच्याकडे असलेल्या अश्र्व चेतक याच्या रक्त गटातील आहे. त्यामुळे त्याची विशेष काळजी घेण्यासाठी बरोबर डॉक्टर व ५ जणांची प्रशिक्षक बलराज सोबत रवाना झाले आहेत. वारीच्या वाटेवर त्याला हिरवा चारा, गहू, भुस्सा, दूध, तूप, हरभरा, गुळ असा खुराक सोबत देण्यात आला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### आषाढी एकादशीच्या महापूजेसाठी मुख्यमंत्र्यांना निमंत्रण



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीची शासकीय महापूजा करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पंढरपूर देवस्थान कडून आज निमंत्रण देण्यात आले. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती यांच्या माध्यमातून सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, तसेच इतर समिती सदस्यांनी वारकरी पगडी, विना, टाळ आणि पांडुरंगाची मूर्ती देऊन आषाढीला राज्यातील जनतेच्या वतीने महापूजा करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना निमंत्रित केले. मुंबई येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन, त्यांना सपत्नीक महापूजेचे निमंत्रण देण्यात आले. या निमंत्रणानंतर खऱ्या अर्थाने पंढरपुरात मंदिरे समितीची आषाढीच्या लगबगीला अधिक गती येऊ लागली आहे.

### कोल्हापुरात २ कोटी रुपयांच्या जबरी चोरी करणाऱ्या टोळीला अटक



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरात गांधीनगर येथून सुमारे २ कोटी रुपयांच्या जबरी चोरीची घटना घडली होती. कोल्हापूर पोलिसांनी दोन पथकांद्वारे तपास करत या गुन्ह्याचा छडा लावला आहे. कंपनीच्या कंपाऊडमध्ये पार्क केलेल्या टेंपोच्या डॅशबोर्डमधून ही १ कोटी ९० लाख रुपयांची रक्कम चोरण्यात आली होती. अज्ञात चोरट्यांनी पाळत ठेवुन गांधीनगर येथील गुडलक स्टेशनरीच्या कंपाऊंडचा पत्रा उचकटुन आतील टेंपोच्या डॅशबोर्डमध्ये ठेवलेली रोख रक्कम चोरून नेली होती. गांधीनगर येथील व्यापारी कैलास वसंत गोरड यांनी फिर्याद दिल्यानंतर गांधीनगर पोलिसांत याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर दोन पथकांद्वारे तपास करत कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने ही चोरी करणाऱ्या टोळीला अटक केली आहे. तर गांधीनगर पोलीस ठाण्याकडून पुढील तपास सुरु आहे.

### देऊळगाव राजा येथील शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलडाणा अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, देऊळगाव राजा येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या वसतिगृहात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, दिव्यांग तसेच अनाथ विद्यार्थी यांना आरक्षित प्रवर्गानुसार प्रवेश देण्यात येणार आहे. देऊळगाव राजा येथील नगरपरिषद हद्दीत येणाऱ्या शाळांमधील शालेय व महाविद्यालयीन स्तरावर प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी या वसतिगृह प्रवेशासाठी पात्र आहेत. प्रवेश अर्ज https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने भरायचे असून, अर्ज भरल्यानंतर त्याची मुळप्रत वसतिगृहात सादर करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी ही संधी मोठ्या संख्येने घेऊन प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन वसतिगृहाचे प्रभारी गृहपाल व्ही. आर. सोनवळ यांनी केले आहे.

### होय, भाजप म्हणजे वॉशिंग मशीन आहे...! पक्षातीलच नेत्याचा कबुलीनामा

**नाशिक/प्रतिनिधी :**अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याचा हस्तक सलीम कुत्ता याच्यासोबत पार्टी केल्याने सुधाकर बडगुजर यांना देशद्रोही ठरवून त्यांना अटकेची मागणी करणाऱ्या भारतीय जनता पक्षातच आता बडगुजर यांचा प्रवेश होणार आहे. मोठे शक्तिप्रदर्शन करीत नाशिकहून मुंबईच्या दिशेने बडगुजर निघाले आहेत. त्यांच्या भाजप प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर पक्षातही दोन गट पडले आहेत. बडगुजर यांना भाजप प्रवेश द्यावा, असे एका गटाचे म्हणणे आहे तर त्यांना भाजपमध्ये अजिबात घेऊ नये, असे काही नेत्यांना वाटते.बडगुजर यांना भाजप प्रवेश दिला तर ज्यांच्यावर आरोप केले, त्यांचाच पक्षप्रवेश घडवून आणला जातो, किंबहुना त्याचसाठी आरोप केले जातात, या विरोधकांच्या आरोपाला बळ मिळेल, असे भाजपमधील काही नेत्यांना वाटते.

# योगाला आपली जीवनशैली बनवा, निरोगी आयुषासाठी योग साधनेला अंगीकारा: आयुष मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** योगाला आपली जीवनशैली बनवा. प्रत्येकाने किमान एक तास तरी योग साधना करा . लहानापासून तर थोरांपर्यंत सर्वांनीच योग साधनेत सहभागी होऊन निरोगी जीवन जगण्याचा मार्ग योग साधना निवडा असं आवाहन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले

११ व्या आंतरराष्ट्रीय योग कार्यक्रम संदर्भात माहिती देण्यासाठी बुलढाणा येथे एका पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते ती पुढे म्हणाले की अकरावाआंतरराष्ट्रीय योग दिन भारतामध्ये आंध्र प्रदेशातील विशाखापट्टण येथे आयोजित करण्यात आला आहे या कार्यक्रमाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू , नागरी उद्यानमंत्री राममोहन नायडू आंध्र प्रदेशचे आरोग्यमंत्री सत्यनारायण यादव उपस्थित राहणार आहेत भारतातील १ लाखाहून अधिक ठिकाणी एकाच वेळी हा कार्यकम आयोजित करण्यात येणार आहे अशी माहिती यावेळी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली ते पुढे म्हणाले की भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने डिसेंबर २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला या सभेने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून मान्यता दिली आणि २०१५ पासून हा २१ जून हा दिवस सर्व जगभरात मोठ्या उत्साहाने योग दिन म्हणून साजरा



केला जातो आज कुठलाही आजार होऊ नये यासाठी योग केला जातो तर आजार बरा व्हावा यासाठी सुद्धा योग साधना केली जाते भारतीय योग साधना सर्व जगामध्ये निरोगी आयुष्यासाठी केली जाते देशातील सर्व एम्स हॉस्पिटलमध्ये योग प्रशिक्षणाचा कार्यक्रम घेतल्या जात आहे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली ‘‘योग फॉर वन अर्थ, वन हेल्थ‘‘ ही थीम भारताच्या २०२३ मधील २० अध्यक्षपदकालीन ‘‘वन अर्थ, वन हेल्थ‘‘ दृष्टिकोनावर आधारित आहे. हा दृष्टिकोन वैयक्तिक आणि ग्रहाच्या कल्याणाच्या परस्परसंबंधांवर जोर देतो, ज्यामध्ये भारतीय तत्त्वज्ञानातील सामूहिक कल्याणाचे प्रतिबिंब दिसते. ‘‘सर्वं संतु निरामया‘‘ (‘‘सर्वांनी रोगमुक्त व्हावे‘‘) हा मंत्र, विशेषतः कोविड-१९ नंतरच्या जगात, लवचिक आरोग्य व्यवस्था, प्रतिबंधात्मक काळजी आणि सामूहिक जागतिक प्रयत्नांच्या महत्त्वाला पूर्णपणे व्यक्त करतो. असे ते म्हणाले योगा संदर्भात १० वेगवेगळे पॅकेट्स तयार करून त्यामध्ये योगासणे निवडण्यात आली आहेत प्रत्येकाने आपल्या जीवनशैलीत योग साधनेला अंगीकारावे हा त्यापाठीमार्गील उद्देश असल्याचे सांगितले शालेय शिक्षणामध्ये योग प्रशिक्षण अभ्यासाचा समावेश करण्यात आल्याचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी सांगितले

## कोल्हापूर जिल्ह्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ





दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. मंगळवारी दुपारी ३ वाजता कसबा बावड्यातील राजाराम बंधाऱ्यावर पंचगंगेची पाणीपातळी २६ फूटावर पोहचली. तर जिल्ह्यातील १७ बंधारे पाण्याखाली गेल्याने या बंधाऱ्यावरुन वाहतूक बंद करण्यात आली आहे. दरम्यान पंचगंगा नदीची इशारा पातळी ३९ फूट तर धोका पातळी ४३ फूट आहे. १७ जून रोजी जिल्ह्याला हवामान खात्याकडून ऑरेंज अर्लट जारी करण्यात आला आहे. मात्र कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात आज काहीअंशी पावसाने उघडीप दिली आहे. परंतु धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम असल्याने राधानगरी धरण देखील ५७ टक्के भरलं आहे. परिणामी धरणातून २५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपात्रात सुरू करण्यात आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना प्रशासनाकडून सतर्कतेच्या सुचना देण्यातआल्याआहेत.

## महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य मित्र उपक्रम; रुपाली चाकणकर यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** महिलांवरील अन्याय, अत्याचार थांबवून त्यांना सुरक्षितता, प्रदान करण्यासाठी तसेच त्यांना तक्रारी दाखल करण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी महिला आयोग कायम आपल्या सोबत आहे. ऊसतोडणी कामगार महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य मित्र उपक्रम राबविण्यात येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथे केले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात येथे १७ जून रोजी बैठक पार पडली. बैठकीत रूपाली चाकणकर म्हणाल्या की, महिला आयोगाच्या वतीने राज्यात बालविवाह, गर्भलिंग निदानचाचणी, स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, विधवा, एकल महिला यांच्या समस्या बाबत जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह रोखण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या कामामध्ये गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्यांची महत्वाची भूमिका असून गावातील नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या मदतीने कोणाच्या दबाबाला



बळी न पडता, बालविवाह आदी कुप्रथा रोखण्यासाठी संकल्प करावा. समाजातील वाढती, बालविवाहाची कुप्रथा रोखणे हे सर्वांचे कर्तव्य असून, बालविवाह रोखण्याची मोहिम प्रभावीपणे राबवावी, यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन राज्य महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाणकणकर यांनी बैठकीत केले.

## तडीपारीची कारवाई रोखण्यासाठी सुधाकर बडगुजर यांचा भाजपात प्रवेश

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची टिका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तडीपारीची कारवाई रोखण्यासाठी सुधाकर बडगुजर यांनी भाजपात प्रवेश घेतला आहे.अशी टिका काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केली.

यावेळी ते म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ही वॉशिंग मशीन असल्याचं पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या वेळेस त्या वॉशिंग मशीनमध्ये काळेकुट्ट व्यवसायाशी संबंधित असलेल्या लोकांनाही पांढरे शुभ्र करण्याचं हे भाजप असल्याचे पुन्हा एकदा



सिद्ध झाले आहे. जर प्रवास बघितला तर छगन भुजबळ, अजित पवार एवढेच नव्हे तर, एकापेक्षा एक हे भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या लोकांना पक्षात प्रवेश दिला आहे आणि आज सुधाकर बडगुजर यांच्या माध्यमातून पक्षप्रवेश म्हणजे आता या वॉशिंग मशीनने शिखर गाठलेला आहे. सलीम कुत्ताशी असणारे त्यांचे संबंध हे भारतीय जनता पार्टीच सांगत होती आणि आता त्यांनीच त्यांना आपल्या पक्षात घेतले आहे. बावनकुळे आणि बडगुजर यांची विशेष मैत्री निर्माण झाली आहे. तेच विरोध करत होते आणि त्यांनीच स्वागत केले आहे. बाहेरून कीर्तन आणि आतून तमाशा हा दाखवण्याचा त्यांचा केविलवाणा प्रयत्न आहे. जर बडगुजर भाजपमध्ये गेले नसते तर ते तडीपार झाले असते. त्यामुळे तडीपारीची कारवाई रोखण्यासाठी त्यांनी भाजपात प्रवेश घेतला आहे.अशी टिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केली.

# शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेशासाठी २४ जूनपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील युवकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू म्हणून घडवण्यासाठी शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रांमध्ये सन २०२५-२६ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी १९ वर्षांखालील पात्र खेळाडूंकरिता सरळ प्रवेश व कौशल्य चाचणीद्वारे निवासी प्रवेश दिला जाणार आहे.

राज्यातील विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रे राज्यातील अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद व पुणे या ठिकाणी शिवछत्रपती क्रीडापीठ पुणे अंतर्गत क्रीडा प्रबोधिनी प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वीत आहेत. सदर ठिकाणी नविन प्रशिक्षणार्थींची निवड करणे प्रस्तावित आहे.

क्रीडा प्रबोधिनीमध्ये समावेश असलेले खेळ प्रकार: आर्चरी, ज्युदो, हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, बॅडमिंटन, शुटिंग, कुस्ती, हॉकी, टेबल टेनिस, वेटलिफ्टींग, जिम्नॅस्टीक्स, जलतरण व फुटबॉल, ट्रायथलॉन, सायकलिंग अश्या १७ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण देण्यात येते.

सरळ प्रवेश प्रक्रीयेद्वारा प्रवेश: क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या हॅण्डबॉल, जलतरण, सायकलींग खेळत राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू तसेच राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडूंची तज्ञ समितीद्वारा चाचणी घेऊन पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे प्रवेश व क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळत राज्यस्तरावर सहभागी खेळाडूना ज्याचे वय १९ वर्ष आतील आहे. अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या वेल्निहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करून तज्ज्ञ समितीद्वारा चाचणी घेऊन पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

**वैद्यकीय चाचणी:** उपरोक्त चाचणीमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकांद्वारे चाचणी घेऊन कीडा प्रबोधिनीमध्ये शारीरिक दृष्ट्या सुरज खेळाडूंची निवड करण्यात येईल.

रहिवास व वयाबाबतची पात्रता: क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार हा १९ वर्षाखालील तसेच महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असणे अनिवार्य आहे

**आवश्यक कागदपत्रे:** कीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार खेळाडूकडे सहभागी झालेल्या राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका / ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**अर्ज कसा व कोठे करावा ? :** पात्र खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका किंवा ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे दि. २४ जून २०२५ पुर्वी सादर करावे. सदर अर्जात खेळाडूचा संपर्क क्रमांक, पुर्ण पत्ता, ई-मेल आयडी नमुद करावा.

विभागस्तरावर चाचण्याचे आयोजन दि. २६ ते २७ जुन २०२५ या कालावधीत विभागीयस्तरावर होणार आहे, तरी बुलडाणा जिल्ह्यातील पात्र संबंधीत खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, कीडानगरी, जाभरुन रोड, बुलडाणा येथुन अर्ज प्राप्त करुन घेऊन, आवश्यक कागदपत्रे दि. २४ जुन २०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यातील अर्जासोबत क्रीडा प्रमाणपत्र, आधारकार्ड, जन्म दाखला, इत्यादी माहिती सादर करावी तसेच अधिक माहितीकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# शिक्षकांवरील निलंबनाच्या कारवाईचा पुनर्रविचार व्हावा

## ॲड.जयश्री शळके यांची जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या १० पेक्षा कमी असल्याचे कारण देत ३५ शिक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. ज्यामध्ये बुलडाणा, चिखली, मेहकर, लोणार, खामगाव, शेगाव, नांदुरा आणि मोताळा तालुक्यातील २० शाळांचा समावेश आहे. परंतु, विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असण्यास अनेक सामाजिक, शैक्षणिक व भौगोलिक कारणे आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी शिक्षकांवरील निलंबनाच्या कारवाईचा पुनर्रविचार व्हावा, अशी मागणी शिवसेना, (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या ॲड.जयश्री शेळके यांच्या नेतृत्वात बुलडाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या काही वर्षांत शासनाच्या उदासिन धोरणांमुळे जिल्हा परिषद शाळांचा दर्जा खालावत चालला आहे. काही शाळांमध्ये विषयनिहाय नियमित शिक्षक नाहीत. पूरक शिक्षण साधने उपलब्ध नाहीत. कित्येक शाळांना योग्य, सुरक्षित व प्रशस्त इमारती नाहीत. काही ठिकाणी वर्ग खोल्या, स्वच्छतागृहे, पाणी सुविधा यांचा सुद्धा अभाव आहे. त्यामुळे प्रशासनाने जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्ता सुधारण्यावर भर देणे अत्यावश्यक आहे. सध्याच्या काळात पालकांचा कल हा इंग्रजी माध्यमाकडे अधिक प्रमाणात आहे. परिणामी ग्रामीण भागातील विद्यार्थीही खासगी इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेत आहेत. त्याचबरोबर रोजगार, शिक्षण व इतर सुविधांच्या अभावामुळे अनेक कुटुंबे गाव सोडून शहरात स्थायिक होत आहेत. त्यामुळे गावातील विद्यार्थी संख्येत घट झाली आहे. ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये जन्मदर कमी झाला असून, परिणामी नवीन



विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी कमी होत आहे. जि.प.च्या ज्या शाळेत पटसंख्या कमी आहे त्या शाळांची त्या शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी कृती कार्यक्रम आखण्यात यावा. शिक्षकांचे निलंबन केल्यानंतर त्या संबंधित जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्नही अनुत्तरीत आहे. कमी संख्या जरी असली तरीरी अत्यंत गरिब, मोलमजुरी करणाऱ्या पालकांची मुले आजही जि.प.शाळेतच शिक्षण घेतात. हे ही नाकारता येणार नाही. निलंबित केलेल्या शिक्षकांची कोणतीही बाजू विचारात न घेता अचानकपणे फक्त शिक्षकांचीच जबाबदारी ठरवून त्यांनाच निलंबित करणे हे अन्यायकारक ठरते. आजही जिल्ह्यातील जि.प शाळांमधील अनेक शिक्षक हे स्वत: जि.प. शाळेच्या सौदर्यीकरणासाठी, गुणवत्ता वाढीसाठी व विद्यार्थ्यांना टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नशिल असतात. तडकाफडकीने करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईने अनेक प्रयोगशिल शिक्षकांवरही अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित गावातील पालकांचे मत विचारात घेऊन निलंबित शिक्षकांना किमान त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निलंबनाच्या कारवाईचा पुनर्रविचार करावा. सरसकट निलंबनाची कारवाई न करता ज्या शाळांच्या संबंधामध्ये जाणिवपुर्वक चूक झाली असेल त्याच ठिकाणी निलंबनाचा निर्णय घ्यावा. यासाठी शिवसेना प्रवक्त्या ॲड.जयश्री शेळके यांच्या नेतृत्वात जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, आशिष खरात, जिल्हा समन्वयक संदीप शेळके, तालुका प्रमुख लखन गाडेकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष मो.सोफियान, रफिक शेठ, शहराध्यक्ष अनिकेत गवळी आदींची उपस्थिति होती.

## महाराष्ट्र शासनाच्या जनकल्याणाच्या सर्व योजना माहीती आणि राबविणे यासाठी विशेष शिबीर

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे

**महार चिकना:** छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान शिबिर योजने अंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक मुलांची शाळा अंजनी खुर्द तालुका लोणार येथे भव्य शिबिराचे दिनांक १८/०६/२०२५ रोजी आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरात शासनाचे सर्व विभाग सहभागी होणार असून महाराष्ट्र शासनाच्या सर्व जनकल्यानाच्या योजनांची माहिती आणि अंमलबजावणी या ठिकाणी करण्यात येणार आहे. यात ॲग्री स्टॅक,महसूल विभाग, संजय गांधी निराधार योजना विभाग, पुरवठा विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग, पशु वैद्यकीय विभाग, बँक आणि इतर विभागांचे अधिकारी, कर्मचारी




उपस्थित राहून नागरिकांच्या अडचणी सोडविण्यात येणार आहेत. तरी अंजनी खुर्द महसूल मंडळातील जास्तीत जास्त लाभार्थी यांनी या शिबिरास उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार श्री भूषण पाटील साहेब ,मंडळ अधिकारी श्री येऊल, श्री केंद्रे ग्राम महसूल अधिकारी श्री हनवते यांनी केले आहे

## चिखलीतील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त शासकीय वसतिगृह, चिखली येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. या वसतिगृहात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग, अनाथ अशा विविध आरक्षित प्रवर्गांतील पात्र विद्यार्थिनींना प्रवेश दिला जाणार आहे. नगर परिषद हद्दीतील शाळा, विद्यालये व महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या, प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना अर्ज सादर करता येणार आहे. प्रवेश अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावा लागणार असून, ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंटआउट (हार्ड कॉपी) वसतिगृहात प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक आहे. या उपक्रमाचा अधिकाधिक विद्यार्थिनींनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी अथवा अर्जासंदर्भात मदतीसाठी संपर्क क्रमांक : ९५०३२२८९८२ क्रमांकावर संपर्क साधावा किंवा थेट वसतिगृहाला भेट द्यावी,असे आवाहन प्रभारी गृहपाल पुनम तारासिंग राठोड यांनी केले आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी अर्जाची १७ जुलैपर्यंत अंतिम मुदत

**बुलढाणा/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, बुलडाणा जिल्हा कार्यालयामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना गुणांनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, गुणपत्रिका, बोनाफाईड प्रमाणपत्र, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड, बँक पासबुक इत्यादी आवश्यक कागदपत्रांसह दि. १७ जुलै पर्यंत कार्यालयीन वेळेत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या.,डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,चिखली रोड, बुलडाणा. येथे प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्री. जे.एम. गाभणे यांनी केले आहे.

## स्वस्त धान्य दुकानावर मार्फत निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप

### भगवान माने यांची तहसीलदाराकडे तक्रार

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शहरातील स्वस्त धान्य दुकानामार्फत निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप केले जात असून या प्रकरणाची कारवाई चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती मेहकर तालुका अध्यक्ष विजय भगवान माने यांनी मेहकरचे तहसीलदार यांना निवेदनाद्वारे १७ जून रोजी केली आहे.

तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मेहकर शहरांमध्ये महाराष्ट्र शासनाकडून पुरविण्यात आलेले धान्य सरकारी स्वस्त धान्य दुकाना मार्फत वितरीत करण्यात येत आहे. त्यामध्ये गहू हे धान्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून त्या धान्यात रेती-व-माती मिश्रित बारीक बारीक खडे व धूळ आहे.सदरील गहू खाण्या लायक नाहीत. निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप करुन शासन एक प्रकारे जनतेच्या आरोग्याशी खेळत आहे. असे निकृष्ट दर्जाचे धान्य (गहू) खाल्ल्यास नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पोटदुखी च्या समस्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाकडून स्वस्त धान्य दुकानांना अन्य-धान्य पुरवठा करतांना



गुणवता निरिक्षकाकडून तपासणी करण्यात येते की नाही, असा संशय निर्माण होत आहे. तसेच संबंधित पुरवठा अधिकाऱ्याचे यावर नियंत्रण आहे किंवा नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाने रेशनकार्ड धारकांना या वेळी माहे जून, जुलै, ऑगस्ट या महिन्याचा एकत्र अन्य धान्य वाटप करण्याचे ठरविले आहे.तरी पुढील वाटपासाठी अन्य धान्य गुणवत्ता निरिक्षकाकडून तपासणी करून चांगल्या प्रतीचे धान्य वाटप करण्यात यावे.अशी मागणी महाराष्ट्र राज्य अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती मेहकर तालुका अध्यक्ष विजय भगवान माने यांनी मेहकरचे तहसीलदार यांना निवेदनाद्वारे १७ जून रोजी केली आहे.

## जिल्ह्यात 1 जुलैपासून ‘वृक्षलागवड सप्ताह; वृक्षलागवड सप्ताहात प्रत्येकाने एका वृक्षाची लागवड करावी

### जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन
### प्रशासनाचे नियोजन सुरू ; जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात १ ते ८ जुलैपर्यंत वृक्षलागवड सप्ताह राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा व तालुका प्रशासनाने नियोजन सुरू केले असून, प्रत्येक नागरिकाने या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन प्रत्येकी एका वृक्षाची लागवड करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

वृक्षलागवड सप्ताहाच्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयातील जिजाऊ सभागृहात सोमवारी आढावा बैठक घेतली. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, डॉ. जयश्री ठाकरे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, ‘‘पावसाळा ही वनसंवर्धनासाठी चांगली संधी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड लावण्याचा संकल्प करावा.’’ तसेच रस्त्यांच्या दुतर्फा सावली देणारी झाडे, मोकळ्या जागांमध्ये औषधी वनस्पती आणि बांबूची लागवड केली जावी. अर्बन फॉरेस्ट्री म्हणजे शहरामध्ये हरित क्षेत्र निर्माण करण्यावर भर द्यावा.

सामाजिक वनीकरण विभागामार्फत जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात झाडांची लागवड करण्याची तयारी केली असून याअंतर्गत इच्छुक नागरिक, शाळा, संस्था यांनाही झाडे उपलब्ध करून द्यावीत. मनरेगा योजनेचा उपयोग करून जॉब कार्डधारकांना वृक्षलागवडीमध्ये सामील करून घ्यावे. यासाठी तहसीलदारांनी नियोजन करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ.पाटील यांनी दिले.

**दत्तक गावांत विशेष लक्ष**

‘दत्तक गाव’ उपक्रमाच्या माध्यमातून निवडलेल्या गावांमध्ये विशेष वृक्षलागवड सप्ताह राबवावा. वृक्षलगवडीसाठी सामूहिक व समन्वय साधून कार्यवाही करावी.



**नागरिकांचा सक्रीय सहभाग वाढवावा**

या मोहिमेमध्ये शाळा, महाविद्यालये, अंगणवाडी, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी मोठ्याप्रमाणात सहभाग घ्यावा, असे आवाहन करत जिल्हाधिकाऱ्यांनी जनजागृती व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

**पर्यावरणासाठी सकारात्मक पाऊल**

‘‘वृक्षलागवड म्हणजे फक्त झाड लावणे नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी आरोग्यदायी वातावरणाची पायाभरणी करणे होय,’’ असे सांगत जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सर्व शासकीय कार्यालयांना त्यांच्या परिसरात झाडे लावावीत. वृक्षलागवड सप्ताहासाठी योग्य नियोजन करुन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

## विविध वृत्त...

### फ्लाईट मध्ये बॉम्ब असल्याच्या धमकी; नागपुरात इमर्जन्सी लँडिंग

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर /प्रतिनिधी :** कोची टू दिल्ली जाणाऱ्या फ्लाईटमध्ये बॉम्ब असल्याच्या धमकीवरून नागपुरात इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. इंडिगोची फ्लाईटमध्ये बॉम्ब असल्याची माहिती मिळताच, इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. नागपूर विमानतळावर सुखरूप फ्लाईट उतरविण्यात आले. यात १५७ प्रवाशी होते. सदर फ्लाईटची पोलीस विभागकडून तपासणी करण्यात आली. यापूर्वी दिल्या गेलेल्या धमक्यांमध्ये काहीच मिळून आले नाही. त्यामुळे यावेळेस नेमकं काय मिळतं याकडे आता लक्ष लागले असताना पोलीस आणि बॉम्ब शोधक पथक विमानातील तपासणी केली असता काही अपरिहार्य वस्तू भेटली नाही. कोची टू दिल्ली जाणाऱ्या इंडिगो फ्लाईटमध्ये पुन्हा सर्व यात्रींना बसविण्यात आले असून पुन्हा दिल्लीकडे जाण्यासाठी फ्लाईटने आकाशात झेप घेतली.

### माळेगाव, मोहेगाव येथील आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करा या मागणीसाठी आमरण उपोषण



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मोताळा तालुक्यातील मोहेगाव माळेगाव येथील १९९८ पासून ते २०२५ पर्यंत विना अडथळा व गुण्यागोविंदाने आदिवासी बांधवांनी वन जमिनी वर शेतीची मशागत करून त्या शेतीच्या भरवशावर आदिवासी बांधव परिवाराचा व शिक्षणाचा चरितार्थ चालू असताना वनविभागाने अचानकपणे नोटीस देऊन तीनच दिवसात कोणतेही म्हणणे एकूण न घेता पोलीस बळाचा वापर करत त्या वन जमिनीवरील घर व शेती निष्कासित केले आहे. आदिवासी बांधवांची संसार हा उघड्यावर आला आहे. त्यामुळे जे काही आदिवासी बांधवांचे घराचे व शेतीचे बेकायदेशीर अतिक्रमण निष्कासन केले आहे. ते त्याच ठिकाणी पुनर्वसन करावे या मागणीसाठी आम्रपाल वाघमारे यांनी १६ जून पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

### जबरदस्तीने चोरी करणाऱ्या तीन आरोपींना पोलिसांनी केलं जेरबंद; आरोपींकडून तब्बल ५ लाखांचा माल केला हस्तगत



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर /प्रतिनिधी :** नागपुरातील रात्री रस्त्यावरील लोकांकडून जबरदस्तीने मोटारसायकल चोरीच्या घटना वाढल्या होत्या त्यासाठी नागपूर पोलिसांनी रात्री गस्त वाढवून रेकॉर्ड वर्ती असलेल्या गुन्हेगारांच्या चौकशीला सुरुवात केली होती. तेव्हाच पाचपावली पोलिस स्टेशन हद्दीत कृपाणी शुक्ला यांच्याकडून तीन इस्मानी मोबाईल आणि पैशाच पाकीट जबरदस्तीने चोरी केलं आणि पळून गेले पांचपावली पोलिसांच्या पथकाने तपास करत तिन्ही आरोपींना पकडले आणि तपास करत असताना एक मोठी बातमी या आरोपीनी उघड केली, पांचपावली, गणेशपेठ, आणि हुडकेश्वर पोलिस स्टेशन हद्दीतील मोटारसायकल, रिक्षा आणि रिक्षांच्या बॅटरी पण चोरी करत होते. आरोपी राकेश झोडापे, पीयूष साळवे, गणेश बुरडे या तीनही आरोपींकडून पांच मोटारसायकल, एक रिक्षा आणि ४ बॅटरी एकूण ५ लाख चा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला असून, पुढील तपास पांचपावली पोलीस करत आहे.

### ज्यांच्यावर देशद्रोहाचे आरोप, त्यांच्यासाठीच पायघड्या, सुधाकर बडगुजर थाटात भाजपमध्ये!

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिकचे ठाकरे सेनेचे महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर यांनी मंगळवारी दुपारी प्रचंड शक्तिप्रदर्शन करीत भाजपमध्ये प्रवेश केला. ठाकरे सेनेत असताना भाजपने त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप करून त्यांना तुरुंगात टाकण्याची मागणी केली होती. अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याचा हस्तक सलीम कुत्ता याच्यासोबत पार्टी केल्याने बडगुजर यांना अटक करून त्यांना कुणाचे पाठबळ आहे, याचा शोध घेण्याची मागणी करणाऱ्या भाजपनेच त्यांना बळ देण्याचे ठरविले आहे.